दि. १६.०४.२०२४

## प्रेस नोट

| | | |
|---|---|---|
| १. | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | लातुर |
| २. | पोलीस स्टेशन, गुन्हा नोंद क्रमांक | शिरूर अनंतपाळ, ता.शिरूर अनंतपाळ जि.लातुर |
| ३. | कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८. |
| ४. | तक्रारदार | पुरूष, वय–६१ वर्षे |
| ५. | आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | संतराम गेमु राठोड, वय ४७ वर्षे, पद–वरिष्ठ सहायक (लेखा), नेमणुक–पंचायत समिती शिरूर अनंतपाळ ता.शिरूर अनंतपाळ जि.लातूर रा.एकंबी तांडा, ता.औसा, जि.लातूर हा.मु. शासकीय कॉलनी,बार्शी रोड लातूर वर्ग–३ |
| ६ | ठिकाण | पंचायत समिती कार्यालय, शिरूर अनंतपाळ, ता.शिरूर अनंतपाळ, जि.लातूर |
| ७ | मागणी केलेली लाचेची रक्कम | ८,०००/–रू. |
| ८ | तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ७,०००/– रू. |
| ९ | स्विकारलेली लाचेची रक्कम | ७,०००/– रू. |
| १० | पडताळणी दिनांक | १६/०४/२०२४ |
| ११ | सापळा दिनांक | १६/०४/२०२४ |
| १२ | **थोडक्यात माहिती :–** यातील तक्रारदार हे परिचर (शिपाई) या पदावरून दिनांक ३०/०४/२०२३ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असून, त्यांचे अर्जित रजेचे रोखीकरण बील, डीए, एरीयर्स बिल व सातव्या वेतन आयोगाच्या फरकाच्या रकमेचे बील काढणारे पंचायत समिती शिरूर अनंतपाळ येथील वरिष्ठ सहायक (लेखा) श्री. राठोड यांनी तक्रारदार यांच्या वरील काढलेल्या बिलाचा मोबदला म्हणून तक्रारदार यांच्याकडे ८,०००/– रूपये लाचेची मागणी केली.<br>आज दिनांक १६/०४/२०२४ रोजी शासकीय पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक श्री राठोड यांनी ८,०००/– रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ७,०००/– रूपये स्विकारण्याचे मान्य करून सदर लाचेची रक्कम स्वत:चे कार्यालयात शासकीय पंचासमक्ष स्वत: स्विकारली आहे.<br>आरोपीस सापळा पथकाने लागलीच लाचेच्या रकमेसह ताब्यात घेतले असून पोलीस स्टेशन शिरूर अनंतपाळ जि.लातूर येथे गुन्हा दाखल करण्याची पुढील प्रक्रिया चालू आहे. | |

सदरची सापळा कार्यवाही डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनानूसार ला.प्र.वि. लातुर चे पोलीस उप अधीक्षक संतोष बर्गे, पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, पोह/फारूक दामटे, भागवत कठारे, भिमराव आलुरे, शाम गिरी, पोकॉ/शिवशंकर कच्छवे, पोकॉ/संदिप जाधव, पोकॉ/मंगेश कोंडरे पोकॉ/दिपक कलवले, पोकॉ/गजानन जाधव, मपोकॉ/रूपाली भोसले, चापोना/संतोष क्षिरसागर यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ०९६२३९९९९४४ |
| २) | श्री. संतोष बर्गे, पोलीस उप अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ०७७४४८१२५३५ |
| ३) | टोल फ्री | :– | १०६४ |
| ४) | हेल्पलाईन क्रमांक कार्यालयाचा फोन क्रमांक | :– | ०२४८२–२४२६७४ |
| ५) | Website | :– | www.acbmaharashtra.gov.in |
| ६) | Mobile App | :– | www.acbmaharashtra.net |
| ७) | Facebook Page | :– | www.facebook.com/maharashtraACB |
| ८) | Twitter | :– | ACBlatur |
| ९) | Instagram | :– | Acblatur |
| १०) | YouTube Channel | :– | anticurruptionbureaulatur1584 |

पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,लातूर

(संतोष ध.बर्गे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर